Exh.1

Issue suit summons to the defendants
to appear and answer the claim by filing
Written Statement of his defense, if any,
within 30 days from date of service of summons
and for settlement of issues and to produce
all documents in his possession of power,
vide VIII Rule 1 & 1A of the code of Civil
Procedure,1908 returnable on dtd.27/01/2026.

Dt.12/01/2026 CJJD, Radhanagari

दै.रजि.नं. २

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE Date: 2026.01.12 17:08:38 +0530

दाखल ता. 05.01.2026

रे.क.नं. /२०२६

CNR:- MHK0190000092026

# मे.दिवाणी न्यायाधीश सो कनिष्ठ स्तर , राधानगरी

यांचे कोर्टात ...

| | |
|---|---|
| १) श्री . अरूण केरवा पाटील<br>व.व.४२, धंदा : शेती<br>रा.कुंभारवाडी , ता.राधानगरी<br>जि. कोल्हापूर | वादी |

विरूध्द

| | |
|---|---|
| १)श्री . सुनिल केरवा पाटील<br>व.व.४४, धंदा : शेती<br>रा.कुंभारवाडी ,ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर | प्रतिवादी |

Assistant Superintendent

| | | |
|---|---|---|
| २)श्री.केरवा कृष्णा पाटील<br>व.व.६५, धंदा : शेती<br>रा.कुंभारवाडी ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर<br><br>३)सौ.सखुबाई केरवा पाटील<br>व.व.६0, धंदा : घरकाम<br>रा.कुंभारवाडी ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर | } | प्रतिवादी |

दावा रू.५२.२६ /-पै
ज्युरीसडिक्शनसाठी रू. १३0.६६/- पै
दावा सरसनिरस मानाने वाटप
होवून मिळणेकरिता.
सी.पी.सी.कलम ९ प्रमाणे

<u>यातील वादींचा दावा खालीलप्रमाणे :</u>

१)<u>मिळकतीचे वर्णन :</u>

Assistant Superintendent.

मौजे कुंभारवाडी ,ता.राधानगरी ,जि.कोल्हापुर येथील प्रतिवादी नं.२ यांचे खाते क.१५७५ व प्रतिवादी नं.३ यांचे खाते क.४१६ मधील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती ः-

| गट नं | एकुण क्षेत्र<br>हे.आर<br>(पोटखराब सहीत) | आकार<br>रू.पै. | पैकी क्षेत्र<br>हे.आर | आकार<br>रू.पै. |
|---|---|---|---|---|
| २६0 | 0.१२.00 | 0.३१ | 0.१२.00 | 0.३१ |
| २६२ | 0.0४.00 | 0.१२ | 0.0४.00 | 0.१२ |
| २६५ | 0.३३.00 | 0.३१ | 0.0८.२४ | 0.0८ |
| ३0६ | 0.0५.00 | 0.५३ | 0.0५.00 | 0.५३ |
| ३१३ | 0.0२.00 | 0.१९ | 0.0१.00 | 0.0९ |
| ३१८ | 0.0३.00 | 0.५३ | 0.0१.५0 | 0.२६ |
| ३२१ | 0.0२.00 | 0.२२ | 0.0१.00 | 0.११ |
| ६५ | 0.२४.00 | 0.४0 | 0.२४.00 | 0.४0 |
| ८0 | 0.0३.00 | 0.१३ | 0.0१.५0 | 0.0६ |

येणेप्रमाणे वर्णनाच्या शेतजमीन मिळकती या दाव्याचा विषय असुन यापुढे त्यास सोयीकरीता "दावा मिळकत" अगर "सदर मिळकत" असेही संबोधले आहे.

२) वर कलम १ मध्ये नमुद मिळकती मुळच्या वादी व प्रतिवादी यांच्या वाडवडीलार्जित मिळकती होय.

३) वर कलम १ मध्ये नमुद मिळकतींच्या सातावारापत्रकी यातील प्रतिवादी नं.२व ३ यांचे नावाची नोंद आहे.सोयीकरीता यापुर्वी प्रतिवादी

Assistant Superintendent

नं.२ व ३ यांची स्वतंत्र खाती करून घेतलेली आहेत. परंतू सदर मिळकतीचे अदयाप वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते व नाही.

४) प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांची दावेच्या न्यायनिर्गतीसाठी वंशावळ खालीलप्रमाणे ः-

कृष्णा

सखुबाई (पत्नी) सुनिल (मुलगा) अरुण (मुलगा)

वरीलप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची वंशावळ असे.

५) प्रस्तुत प्रतिवादी नं.१ हे वादींचे मोठे भाऊ आहेत. प्रतिवादी नं.२ हे वादी व प्रतिवादी नं.१ यांचे वडील आहेत. तसेच प्रतिवादी नं.३ या वादी व प्रतिवादी नं.१ यांच्या आई आहेत.

६) वर कलम १ मध्ये नमुद मिळकतीमध्ये वादी यांना जन्मतःच अविभाज्य असा हिस्सा प्राप्त झालेला होता व आहे. अदयाप सदर दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते व नाही. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे संमतीने दावा मिळकतीमध्ये सामाईक कब्जेवहीवाट करीत आलेले होते व आहेत.

Assistant Suprintendent.

७) अलिकडे दि.३०.१२.२०२५ इ.रोजी वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दावा मिळकतीमधील त्यांना येणाऱ्या १/३ हिस्स्याचे सरसनिरसमानाने वाटप होवून तुटक कब्जा देणेबाबत विनंती केली असता प्रतिवादी यांनी हिस्सा तुटक करून देणेस स्पष्ट नकार दिला. सदरप्रमाणेचे प्रतिवादी यांचे कृत्य हे बेकायदेशीर व अनाधिकाराचे असे असून हिंदु कायदयातील तरतुदीविरूध्द आहे.

८) त्याकारणाने वादींना प्रतिवादी यांचेविरूध्द, "वर कलम १ मध्ये नमुद मिळकतीमधील वादींचा कायदयाने येणारा १/३ हिस्स्याचे सरसनिरसमानाने वाटप होवून त्याचा तुटक कब्जा मिळणेबाबत व तसा ठराव व हुकूमनामा होवून मिळणेबाबत" प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

९) <u>दावेस कारण ः</u>

अलिकडे दि.३०.१२.२०२५ इ.रोजी वादी यांनी प्रतिवादी नं.१ व २ यांचेकडे दावा मिळकतीमधील ज्याचे त्याचे हिस्सेचे विभाजन करून हिस्सा तुटक करून घेणेबाबत विनंती केली असता प्रतिवादी यांनी हिस्सा तुटक करून देणेस स्पष्ट नकार दिला तेव्हा व तदनंतर वेळोवेळी प्रस्तुत दाव्यास कारण घडले असे.

Assistant Suprintendent

१0) <u>दाव्याचा तपशिल व आकारणी</u> ः

| | |
|---|---|
| रू.५२.२६ पै. | दावा मिळकत कलम १ मधील शेतमिळकतींचा एकुण आकार रू.१.९६ पै.त्याची ८0 पट रक्कम रू.१५६.८ पै यापैकी वादींचे १/३ हिस्सेची रक्कम सदरी दाखल करून त्यावर बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट कलम ६ (V) प्रमाणे योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे. |
| रू.५२.२६ पै. | एकुण |

११) कोर्ट फि करिता रू.५२.२६ /- पै. व ज्युरिसडिक्शन करिता दावेची आकारणी रू.१३0.६६ /- पै. केली असुन त्यावर दि बॉम्बे कोर्ट फि ॲक्ट व सुट व्हॅल्युएशन ॲक्ट प्रमाणे योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावला आहे.

१२) प्रस्तुत वादी ,प्र.वादी , व दावा मिळकत याच मे. कोर्टाच्या स्थलसिमेत असलेने प्रस्तुतचा दावा या मे.कोर्टास चालवणेचा हक्क व अधिकार आहे.

१३) दावा मिळकतीच्या सातवारापत्रकी अन्य सहहिस्सेदारांची नावे नमुद आहेत.परंतू त्यांची नावे स्वतंत्र असलेने त्यांना याकामी पक्षकार केलेले नाही.

Assistant Superintendent.

१४) प्रस्तुत दावा मुदतीत आहे.

१५) प्रस्तुत दावेतील वादी व प्रतिवादी यांचेपैकी कोणीही विकलांग नाही.

१६)<u>सबब वादीची विनंती की</u>

अ. वर कलम १ मध्ये नमुद मिळकतीमधील वादींचा कायदयाने येणारा १/३ हिस्स्याचे सरसनिरसमानाने वाटप होवून त्याचा तुटक कब्जा मिळणेबाबत व तसा ठराव व हुकूमनामा व्हावा.

ब. जरूर तर दावा दुरूस्तीस परवानगी असावी.

ज. न्यायाचे सर्व हुकुम याच कामी वादीचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे दावा असे.

सोबत वकिलपत्र, पत्तामेमो ,कागद यादी, यादीप्रमाणे कागद , प्रतिवादीसाठी नकला जोडल्या आहेत.

राधानगरी

दि.2.0१.२०२६

दावा तयार व दाखल करणार

(ॲड.व्ही.टी.धनवडे)

Assistant Superintendent

## प्र ति ज्ञा

मी यातील वादी श्री. अरूण केरवा पाटील व.व.४२ धंदा : शेती रा. कुंभारवाडी ता. राधानगरी जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो कि वर नमुद दावेतील सर्व मजकुर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

दि. २.०१.२०२६

## ॲ फि डे व्ही ट

मी यातील वादी श्री. अरूण केरवा पाटील व.व.४२ धंदा : शेती रा. कुंभारवाडी ता. राधानगरी जि. कोल्हापूर देवाच्या शपथेवर ॲफिडेव्हीट करते की वर नमुद दावेतील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी

दि. २.०१.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो

(ॲड. व्ही. टी. धनवडे)

Assistant Supdintendent

# प्र ति ज्ञा

मी यातील वादी श्री.अरूण केरवा पाटील व.व.४२ धंदा : शेती रा.कुंभारवाडी ता.राधानगरी जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते कि वर नमुद दावेतील व ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

दि.२.०१.२०२६ (श्री.अरूण केरवा पाटील)

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. .....
Age...42...Occu.....
of.....
Who identified by Shri./Smt.....
Adv. Whom I Know personally
Dated.. 21/1/2026
Assistant Superintendent